# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : २९ जानेवारी २०१९

## ( बैठक क्र. २०९ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | लोक आयुक्तांच्या कार्यकक्षेत आता मुख्यमंत्री पदाचा समावेश | सामान्य प्रशासन |
| २ | मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पामध्ये आणखी ५ हजार ६२५ कॅमेऱ्यांची भर | गृह विभाग |
| ३ | चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे शासकीय कृषी महाविद्यालय | कृषी विभाग |
| ४ | केंद्र शासनाची स्टँड अप इंडिया योजना<br>अनुसूचित जाती-नवबौद्ध समाजातील उद्योजकांना राज्य शासन १५ टक्के मार्जिन मनी देणार | सामाजिक न्याय विभाग |
| ५ | उच्चदाब उपसा जलसिंचन योजनांना सवलतीच्या दरात वीजपुरवठा होणार | ऊर्जा विभाग |
| ६ | गावठाणासह गावातील सर्व मालमत्ताधारकांना जीआयएस आधारित मालमत्ता पत्रक देणार | ग्रामविकास |
| ७ | महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणेमुळे २६ मार्च २०१५ पासूनच्या निवडणुकांनाही लाभ | ग्रामविकास |
| ८ | महाराष्ट्र शेतजमीन अधिनियमात सुधारणा<br>एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पांना शेतजमीन खरेदीच्या कमाल धारणा मर्यादेतून सूट | महसूल विभाग |
| ९ | औद्योगिक वापरासाठी दिलेल्या शासकीय जमिनी अधिमुल्य आकारून इतर कारणांसाठी वापरता येणार | महसूल विभाग |

## लोक आयुक्तांच्या कार्यकक्षेत आता मुख्यमंत्री पदाचा समावेश

राज्याच्या लोक आयुक्तांच्या चौकशीच्या कार्यकक्षेत मुख्यमंत्री या पदाचा समावेश करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यासोबतच लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांच्या नेमणुकीत सर्व समावेशकता आणि पारदर्शकता आणण्यासाठी सुधारणा करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यात लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम-१९७१ नुसार लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांची निर्मिती करण्यात आली. अशी पदे निर्माण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले होते. या अधिनियमाच्या तरतुदीनुसार लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय स्थापित झाले असून २५ ऑक्टोबर १९७२ पासून या कार्यालयाच्या कामकाजास सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र शासनाने किंवा शासनाच्यावतीने करण्यात आलेल्या किंवा महानगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच शासनाच्या मालकीची किंवा नियंत्रणाखालील महामंडळे, कंपन्या यासारख्या काही प्राधिकारी संस्थातर्फे करण्यात आलेल्या प्रशासकीय कार्यवाही संबंधिच्या जनतेच्या गाऱ्हाण्यांची आणि लाचलुचपत अभिकथनाच्या तक्रारींची चौकशी या अधिनियमाच्या तरतुदीनुसार लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांना करता येते. मात्र, त्यात मुख्यमंत्री या पदाचा समावेश नव्हता.

केंद्र शासनाचा लोकपाल आणि लोक आयुक्त अधिनियम-२०१३ संमत करण्यात आला आहे. केंद्रीय लोकपाल अधिनियमातील तरतुदी विचारात घेऊन राज्याच्या महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम-१९७१ मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याचा प्रस्ताव आज सादर करण्यात आला. या सुधारणेंमुळे लोक आयुक्त अधिक सक्षम होणार आहे. तसेच याची कार्यकक्षा वाढून तो अधिक प्रभावी ठरणार आहे. यासोबतच लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्या नेमणुकीसाठी शिफारस करण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती स्थापन करण्याची तरतूद समाविष्ट करण्यात आली आहे. या समितीत विधानसभेचे अध्यक्ष, विधानसभेतील विरोधी पक्षनेते, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अथवा त्यांनी नियुक्त केलेले उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि राज्यपाल नियुक्त विधिज्ञ अशा चार सदस्यांचाही समावेश असेल. तसेच नियुक्ती करण्याच्या दृष्टीने सहाय्य करण्यासाठी विविध क्षेत्रातील नामांकित सात सदस्यांची एक सर्च कमिटी देखील स्थापन करण्याच्या तरतुदीचा देखील समावेश करण्यात आला आहे. या समितीत लोकप्रशासन, विधि, धोरण, लाच-लुचपत प्रतिबंध, वित्त व व्यवस्थापन आदी क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवर तसेच विविध मागासवर्ग संवर्गातील प्रतिनिधी समाविष्ट असतील.

-----o-----

गृह विभाग

## मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पामध्ये आणखी ५ हजार ६२५ कॅमेऱ्यांची भर

मुंबई शहर सीसीटीव्ही संनिरीक्षण प्रकल्पांतर्गत महानगरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत आहेत. हा प्रकल्प अधिक व्यापक व प्रभावी करण्यासाठी शहरात अतिरिक्त ५ हजार ६२५ कॅमेरे बसविण्यास व त्यासाठी ३२३ कोटी २३ लाख रुपयांच्या खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

मुंबई शहर सीसीटीव्ही संनिरीक्षण प्रकल्पांतर्गत, मुंबई शहरामध्ये यापूर्वी १ हजार ५१० ठिकाणी मिळून ४ हजार ७१७ सीसीटीव्ही कॅमेरे लावले असून हा प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झाला आहे. प्रकल्पाच्या करारातील तरतुदीनुसार, मुंबई शहरात अतिरिक्त ५ हजार ६२५ कॅमेरे लावण्यात येणार आहेत. त्यासाठी एकुण ३२३ कोटी २३ लाखांचा खर्च होणार आहे. या खर्चामध्ये खोदकाम परवानगी, प्रत्यक्ष खोदकाम खर्च आणि खोदकामानंतर रस्ते पूर्ववत करणे यांचा समावेश नाही. प्रकल्पाच्या करारातील तरतूदी व तांत्रिक बाबी विचारात घेऊन उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीने घेतलेल्या निर्णयानुसार एल ॲण्ड टी कंपनीमार्फत हे काम करण्यात येणार आहे.

पूर्वी लावण्यात आलेले ४ हजार ७१७ कॅमेरे आणि आज मान्यता देण्यात आलेले अतिरिक्त ५ हजार ६२५ कॅमेरे असे दोन्ही मिळून एकूण कॅमेऱ्यांची संख्या १० हजार ३४२ इतकी झाली आहे. त्याच्या एकत्रित १ हजार ३०३ कोटी ५६ लाख रुपयांच्या प्रकल्प खर्चासदेखील सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मुंबई शहर सीसीटीव्ही संनियंत्रण प्रकल्पामुळे वाहतुकीचे नियमन करण्यासह कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत होत असून अतिरिक्त कॅमेऱ्यांमुळे ही क्षमता आणखी विस्तारणार आहे.

-----o-----

कृषी विभाग

## चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे शासकीय कृषी महाविद्यालय

चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यात शासकीय कृषी महाविद्यालय स्थापनेस मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाअंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या या महाविद्यालयाची प्रतिवर्ष प्रवेशक्षमता ६० विद्यार्थी इतकी असणार आहे. या महाविद्यालयासाठी आवश्यक ११० पदांच्या निर्मितीसह ६३ कोटी ४८ लाख इतक्या खर्चास यावेळी मान्यता देण्यात आली. या महाविद्यालयासाठी आवश्यक मनुष्यबळ व इतर सुविधा उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

सामाजिक न्याय विभाग

केंद्र शासनाची स्टँड अप इंडिया योजना

## अनुसूचित जाती-नवबौद्ध समाजातील उद्योजकांना राज्य शासन १५ टक्के मार्जिन मनी देणार

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नव उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना प्रकल्पाच्या कमाल १५ टक्के मार्जिन मनी (Front end subsidy) देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया या योजनेतील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नव उद्योजकांकडे मार्जिन मनी भरण्याची क्षमता नसल्याचे आढळून आले आहे. या नव उद्योजकांना प्रकल्पाच्या २५ टक्के स्वत:चा सहभाग द्यावा लागतो आणि उर्वरित ७५ टक्के निधी बँकांकडून कर्जस्वरुपात उपलब्ध करून दिला जातो. बहुतांशवेळा स्वनिधी भरण्यास असमर्थ ठरल्याने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नव उद्योजकांना या योजनेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे या नव उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी स्वनिधीपैकी जास्तीत जास्त १५ टक्के मार्जिन मनी देण्याचा निर्णय घेण्यात आला. स्टँड अप इंडिया योजनेतील सर्व निकषांची पूर्तता करण्याबरोबरच अर्जदाराने मार्जिन मनीतील स्वत:चा १० टक्के हिस्सा भरल्यानंतर व बँकेने अर्जदारास ७५ टक्के कर्ज वितरित केल्यानंतर जास्तीत जास्त १५ टक्के मार्जिन मनी स्वरुपात संबंधित बँकेस समाजकल्याण आयुक्तांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.

या योजनेसाठी २०१८-१९ मध्ये अनुसूचित जाती उपयोजनेतून २५ कोटी निधी पुनर्विनियोजनाद्वारे किंवा पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यास व भविष्यात योजनेच्या मागणीप्रमाणे निधी कमी-अधिक करण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेच्या वेळोवेळी आढावा घेण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीमध्ये उद्योग सचिव आणि सिडबीच्या (भारतीय लघुउद्योग विकास बँक) प्रतिनिधींचा समावेश आहे.

-----०-----

ऊर्जा विभाग

## उच्चदाब उपसा जलसिंचन योजनांना सवलतीच्या दरात वीजपुरवठा होणार

राज्यातील शेतकऱ्यांना वाढीव वीजदराचा फटका बसू नये यासाठी उच्चदाब उपसा जलसिंचन योजनांना प्रति युनिट १ रुपया १६ पैसे असा सवलतीचा वीजदर लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. पूर्वलक्षी प्रभावाने १ नोव्हेंबर २०१६ पासून मार्च २०२० पर्यंत हा वीजदर लागू राहणार आहे. या दरामुळे महावितरणवर पडणाऱ्या आर्थिक भाराच्या प्रतिपूर्तीसाठी महावितरणला शासनाकडून १०७ कोटी ७३ लाख रूपये देण्यात येणार आहेत.

नदीपासून फक्त ५० मीटर उंचीपर्यंत कालव्याद्वारे पाणी पोहोचविता येते. परंतु ५० मीटर ते २०० मीटर उंचीपर्यंत २ ते ५ टप्प्यात पाणी पोहोचविण्यासाठी अनेक अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी संस्थांची स्थापना करून उपसा जलसिंचन योजना सुरू केल्या आहेत. या योजना सुरू करण्यासाठी त्यांनी बँकांकडून कर्जे घेतली आहेत. या योजनांचा वीजदर वाढविल्यास त्याचा परिणाम योजनांची कार्यक्षमता आणि शेती उत्पादनावर होईल. त्यामुळे या योजनांसाठी सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने आज घेतला.

-----०-----

## गावठाणासह गावातील सर्व मालमत्ताधारकांना जीआयएस आधारित मालमत्ता पत्रक देणार

राज्यातील सर्व गावांच्या गावठाणांमधील जमिनींचे जीआयएस आधारित सर्वेक्षण व मॅपिंग करून मिळकत पत्रिका स्वरुपात अधिकार अभिलेख तयार करण्याचा महत्त्वाचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. तसेच गावातील मालमत्तांचे जीआयएस प्रणालीवर आधारित मालमत्ता पत्रक तयार करण्यासही मान्यता देण्यात आली.

आजच्या निर्णयामुळे शासनाच्या मालकीच्या हजारो कोटी किंमत असलेल्या मिळकतींचे संरक्षण होईल, मिळकतींचा नकाशा तयार होईल व तिच्या सीमा निश्चित होतील. त्याचप्रमाणे मिळकतीचे नेमके क्षेत्र माहीत होईल व मालकी हक्काची अभिलेख मिळकत पत्रिका (Property Card) तयार करता येईल. तसेच गावातील रस्ते, शासन-ग्रामपंचायतीच्या खुल्या जागा, नाले यांच्या सीमा निश्चित होऊन अतिक्रमण रोखणे शक्य होणार आहे. तसेच ग्रामपंचायतीला गावातील कर आकारणी, बांधकाम परवानगी, अतिक्रमण निर्मूलन यासाठी अभिलेख व नकाशे उपलब्ध होतील. मिळकत पत्रिका तयार झाल्यामुळे घरावर कर्ज घेण्याची सुविधा आणि मिळकतीला तरलता येऊन गावाची आर्थिक पत उंचावणे शक्य होणार आहे. ग्रामस्थांमध्ये जागेवरून आपापसात निर्माण होणारे वाद सोडविण्यास मदत होईल.

या योजनेची अंमलबजावणी मंत्रालयातील ग्रामविकास विभाग, पुण्यातील जमाबंदी आयुक्तांचे कार्यालय आणि डेहराडून येथील भारतीय सर्वेक्षण विभागाच्या संयुक्त सहभागाने करण्यात येणार आहे. जमिनीचे मोजमाप करून त्यावरील मालमत्तांचे मिळकत पत्रक ग्रामस्थांना उपलब्ध करण्यासाठी जमाबंदी आयुक्तांच्या सहाय्याने भूमापन करण्यात येईल. ही योजना अंदाजे ३६ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित आहे. राज्यातील ३९ हजार ७३३ गावांतील सुमारे १.४ कोटी मालमत्तांसाठी मिळकत पत्रिका तयार करून संबंधितांना अधिकार अभिलेख उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या योजनेत गावठाणातील मालमत्तांचे जीआयएस आधारित रेखांकन व मुल्यांकन करणे, गावठाणातील प्रत्येक घराचा, खुल्या जागेचा आणि रस्त्याचा नकाशा तयार करणे, तसेच गावठाणातील प्रत्येक घर, खुली जागा, रस्ता, गल्ली, नाला यांना नगर भूमापन क्रमांक देणे, त्याचप्रमाणे प्रत्येक मिळकतीची महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम-१९६६ च्या तरतुदीनुसार मिळकत पत्रिका तयार करणे या बाबींचा समावेश आहे.

गावाची वाढती लोकसंख्या, विकासाच्या निरनिराळ्या योजनांमुळे गावात भौगोलिक बदल होत असून जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. गावठाण कार्यक्षेत्रातील बांधकाम परवाने देण्याचे अधिकार योग्य पद्धतीने हाताळण्यासाठी जागेचा नकाशा व गावठाणाचे भूमापन असणे आवश्यक आहे. मात्र, ग्रामीण भागात गावठाणाचे अभिलेख नसल्यामुळे नेमकी जागा किती आहे, याबाबत सुस्पष्टता नसते. तसेच मालमत्तेचे मालकीपत्र नसल्यामुळे आर्थिक पतही निर्माण होत नाही. ग्रामपंचायतींकडून वितरित होत असलेले नमुना ८ च्या दाखल्यांना वैधानिक आधार नसून याद्वारे ग्रामस्थांना बँकेकडून कर्जासाठी तारण म्हणून उपयोग होऊ शकत नाही, असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने अन्य एका प्रकरणात दिले आहेत. अशा प्रकारे राज्यातील ग्रामस्थांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी आजचा निर्णय घेण्यात आला.

ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्यासाठी स्वत:च्या उत्पन्नाचे स्रोत निर्माण करुन त्यामध्ये सातत्याने वाढ करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतींसाठी मालमत्ता कर हा उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असला तरी वाढत्या नागरीकरणाच्या प्रमाणात कराच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसून येत नाही. याच्या प्रमुख कारणांमध्ये संबंधित ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व मिळकती किंवा मालमत्ता या मालमत्ता कराच्या जाळ्यात आलेल्या नसणे अथवा त्यांची गणना झालेली नसणे आणि मिळकतींवर आकारण्यात

येणारा मालमत्ता कर व प्रत्यक्ष क्षेत्र यामध्ये तफावत असणे या बाबींचा समावेश आहे. तसेच परवानगी दिलेल्या वापराव्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ प्रत्यक्षात वापर असणे आणि मालमत्तांचे पुनर्मुल्यांकन न करणे यांचाही त्यात समावेश होतो.

आजच्या निर्णयानुसार राज्यातील सर्व गावांच्या गावठाणाची मोजणी ड्रोन व तत्सम अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे करण्यात येणार आहे. तसेच गावठाणांच्या जमिनींचे जीआयएस मुल्यांकन करुन मालमत्ता पत्रक तयार करण्यात येतील. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम-१९६६ च्या कलम १२७ नुसार मालमत्ता धारकाकडून सर्वसाधारणपणे प्रति मालमत्ता सरासरी ५०० रुपये सनद फी घेण्यात येणार आहे. मात्र, २५ चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्रफळ असणाऱ्या मिळकतीस सवलतीच्या दराने सनद फी आकारण्यात येणार आहे. योजनेसाठीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. तसेच गावठाण भूमापनासाठी आवश्यक असणारे कर्मचारी-मदतनीस यांची पदे भूमी अभिलेख विभागातून सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांमधून करार पद्धतीने भरण्यात येतील. या योजनेची अंमलबजावणी करताना उद्भवणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी वित्त तसेच महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव, माहिती तंत्रज्ञानचे प्रधान सचिव आणि ग्राम विकास विभागाचे सचिव यांची शक्ती प्रदत्त समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेच्या जलद अंमलबजावणीसाठीचे सर्व निर्णय ही समिती घेईल.

-----०-----

ग्रामविकास विभाग

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणेमुळे**
**२६ मार्च २०१५ पासूनच्या निवडणुकांनाही लाभ**

राज्यातील जात पडताळणी समित्यांवर असलेल्या वैधता प्रमाणपत्र देण्याच्या जास्तीच्या भारामुळे निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यात अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी बारा महिन्यांची मुदत देण्यात आली होती. यासंदर्भात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात करण्यात आलेल्या सुधारणेचा लाभ ३१ मार्च २०१६ पूर्वीच्या ग्रामपंचायत निवडणुकांना होण्यासाठी त्यात आज आणखी सुधारणा करण्यात आली. त्यानुसार आता ३१ मार्च २०१६ ऐवजी २६ मार्च २०१५ अशी सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (१क) आणि कलम ३०-१क मध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्यासाठी राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. मात्र, जात पडताळणी समित्यांवर वैधता प्रमाणपत्र देण्याच्या कामाचा अत्याधिक भार असल्यामुळे ते वेळेत देणे शक्य होत नाही. त्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी असलेली सहा महिन्यांची मुदत वाढवून ती बारा महिने करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात केलेल्या बदलासंदर्भात अधिनियमास विधिमंडळाची मान्यता मिळून १४ डिसेंबर २०१८ रोजी राजपत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. यानुसार बारा महिन्यांची मुदतवाढ ३१ मार्च २०१६ पासूनच्या निवडणुकांना लागू करण्यात आली आहे.

मात्र, ही सुधारणा ३१ मार्च २०१६ पूर्वीच्या ग्रामपंचायत निवडणूकांसाठी लागू होत नव्हती. त्यामुळे दि.२६ मार्च २०१५ ते ३० मार्च २०१६ मध्ये पार पडलेल्या निवडणुकांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या सदस्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांचीच मुदत मिळत होती. त्यामुळे आता ३१ मार्च २०१६ ऐवजी २६ मार्च २०१५ अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यास

मान्यता देण्यात आली. त्यानुसार २६ मार्च २०१५ पासूनच्या निवडणुकांना आता या निर्णयाचा फायदा होणार आहे.

-----o-----

महसूल विभाग

महाराष्ट्र शेतजमीन अधिनियमात सुधारणा

**एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पांना**

**शेतजमीन खरेदीच्या कमाल धारणा मर्यादेतून सूट**

राज्यात एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पांसाठी शेतजमीन खरेदी करताना शेतजमीन धारणेच्या कमाल मर्यादेतून सूट देण्यासाठी महाराष्ट्र शेतजमीन जमी)न धारणेची कमाल मर्यादाअधिनियम (ात सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आलीयामुळे शासनाच्या . सर्वांसाठी घरे या महत्वाकांक्षी योजनेला अधिक बळ मिळणार आहे.

खऱ्याखुऱ्या औद्योगिक किंवा अन्य बिगर कृषी वापरासाठी औद्योगिक उपक्रमाकडून धारण करण्यात आलेली किंवा धारण करावयाच्या जमिनीस सूट देण्याची तरतूद महाराष्ट्र शेतजमीन जमीन ) धारणेची कमालमर्यादाअधिनियम (- ४७ च्या कलम १९६१(२) (क ,तथापि .आहे मध्ये करण्यात आलेली ( महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम-नुसार निश्चित ४४ किंवा १८ मधील कलम १९६६ केलेल्या एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पासाठी संबंधित कंपनी, सार्वजनिक न्यास किंवा संस्था यांना कमाल मर्यादेपेक्षा अधिक जमीन खरेदी करण्यासाठी सूट देण्याची तरतूद नसल्यामुळे या प्रकल्पासाठी अधिकची जमीन खरेदी करण्यास बाधा येत होती यासाठी .अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----o-----

महसूल विभाग

**औद्योगिक वापरासाठी दिलेल्या शासकीय जमिनी**

**अधिमुल्य आकारून इतर कारणांसाठी वापरता येणार**

औद्योगिक वापरासाठी मंजूर केलेल्या शासकीय जमिनीचा वापर (नझूल जमिनी वगळून) अधिमुल्य आकारुन इतर कारणांसाठी करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे अशा प्रकारच्या जमिनी विकास प्रक्रियेत सामावून घेण्यास मदत होणार आहे.

विशिष्ट प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या शासकीय जमिनीचा मंजूर प्रयोजनाऐवजी अन्य प्रयोजनासाठी वापर करण्यास परवानगी देण्यासंबंधीच्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील प्रस्तावांना शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहणार आहे. उर्वरित क्षेत्रातील अशा प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना राहणार आहेत. औद्योगिक घटकांना शासनाचे भूसंपादन कायद्यानुसार संपादित करून दिलेल्या जमिनींसाठी हे धोरण लागू होणार नाही. त्यासाठी यापूर्वीचीच शासकीय पद्धती अवलंबण्यात येईल.

-----o-----